पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८

मा. ह प्रभाग मासीक सभा

कार्यपत्रिका क्रमांक – १०

सभावृत्तांत

दिनांक – ६ / १२ / २०१८ वेळ. दुपारी १२.०० वाजता

.......................................................................................................................................................

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. ह प्रभाग समिती मासिक सभा गुरुवार दिनांक ०६/१२/२०१८ रोजी दुपारी १२.०० वाजता ह क्षेत्रीय कार्यालयातील "पं.दीनदयाळ उपाध्याय सभागृहात" आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य / सदस्या उपस्थित होते.

| अ.क्र. | सन्मा.सदस्य नांव | |
|---|---|---|
| १ | मा. कांबळे अंबरनाथ चंद्रकांत | सभापती |
| २ | मा.सुलक्षणा राजू धर | सदस्या |
| ३ | मा. शाम गणपतराव लांडे | सदस्य |
| ४ | मा. सुजाता सुनिल पालांडे | सदस्या |
| ५ | मा. बनसोडे राजू विश्वनाथ | सदस्य |
| ६ | मा. आशा धायगुडे – शेंडगे | सदस्या |
| ७ | मा. काटे स्वाती (माई) चंद्रकांत | सदस्या |
| ८ | मा.रोहित (आप्पा) सुदाम काटे | सदस्य |
| ९ | मा. राजापुरे माधवी राजेंद्र | सदस्या |
| १० | मा. चौगुले सीमा दत्तात्रय | सदस्या |
| ११ | मा. संतोष बबन कांबळे | सदस्य |
| १२ | मा. उषा उर्फ माई मनोहर ढोरे | सदस्या |
| १३ | मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे | सदस्य |
| १४ | मा. अनिकेत राजेंद्र काटे | स्विकृत सदस्य |
| १५ | मा. संजय गुलाब कणसे | स्विकृत सदस्य |

याशिवाय श्रीम.आशा राऊत प्रशासन अधिकारी तथा क्षेत्रीय अधिकारी, श्री.केशवकुमार फुटाणे, (कार्य. अभियंता स्था),श्री.संजय भोसले (कार्य. अभियंता जनि), श्री.विजयसिंह भोसले (उप अभियंता स्था), श्री. शिरीष पोरेड्डी (उप अभियंता स्था),श्री.ऐ.बी.कोंडे (उपअभियंता जनि), श्री.पाटील एस.बी. (उप अभियंता पापु ), श्री.संजय काशिद (उप अभियंता बी.आर.टी.एस.स्था), श्री.नरोटे सुनिल (उपअभियंता स्था.उद्यान), श्री.मोहर खोंद्रे (उप अभियंता झोनिपु), श्री. पटेल जे.व्ही. (सहा.उद्यान अधिक्षक), श्री.जाधव शंकर (वैद्यकिय उ.अधिक्षक), श्री. पवन साळवे ( अति. आरोग्य वैद्यकिय अधिकारी), श्री. देवचके यु.गु. (अतिक्रमण निरीक्षक), श्री.जाधव अजय ( (मु.आ. नि.), श्री.सुनिल दांगडे (क.अ.), श्री.गुरव शेखर (क.अ.नगररचना), श्री. खरटमोल एम.व्ही (क.अ.पापु), श्रीम.जयश्री साळवे

क्रीडा पर्यवेक्षक, श्रीम.अंकिता मोरे (क.अ.स्था.उ.), श्रीम.एस.एस.कुलकर्णी (क.अ.पापु), श्री.निलेश दाते (क.अ.पापु), श्री.एस.पी.बनसोडे (क.अ.वि.), श्री. समीर दळवी (क.अ.वि), श्री. महेंद्र देवरे (क.अ.स्था), श्री. यादव प्रिती (क.अ.जनि), श्री.अमित दिक्षित (क.अ.पापु), श्री.अमर जाधव (क.अ.पापु), श्री.संदिप लोहकरे (क.अ.जनि), श्री.जिंतीकर आर.एस.(क.अ.ज.नि.), श्री.सानप एस.एस. (क.अ.स्थापत्य), श्री. कांबळे व्ही.सी. (क.अ.स्थापत्य), श्री.उध्दव डबरी (आ.नि.), श्री.इंगेवाड एस.एम. (आ.नि.), श्री.एस.बी.मानमोडे (आ.नि), इ. अधिकारी सभेस उपस्थित होते.

ऐनवेळचे विषय सभा कामकाजात खालीलप्रमाणे दाखल करुन घेणेत आले

विषय क्र. ३) प्र.क्र.३० कासारवाडी येथील सर्व्हे क्र. ४९७/२अ येथे नव्याने विकसीत करण्यात आलेल्या क्रीडांगणास कासारवाडीतील ज्येष्ट सामाजिक कार्यकर्ते "कै.तानाजी पांडुरंग लांडगे" असे नाव देणेबाबत – मा.रोहित काटे, मा.आशा धायगुडे – शेंडगे यांचा प्रस्ताव

विषय क्र.४) प्र.क्र.३० दापोडी येथील आई उद्यानातील ओपन जिमचे साहित्य मोडकळीस आलेले आहे. त्याचे काही भाग तुटलेल्या अवस्थेत आहेत. तरी आई उद्यानातील ओपन जिमचे नवीन साहित्य बसविणेबाबत - मा.रोहित काटे,मा.राजू बनसोडे यांचा प्रस्ताव

विषय क्र.५) प्र.क्र.२० संत तुकाराम नगर येथील घर नंबर २८३२ ते २९१९ या परिसरात श्री.दत्त दिगंबरा कॉलनी हे नांव देणेबाबत – मा.सुजाता पालांडे,मा.उषा ऊर्फ माई ढोरे यांचा प्रस्ताव

विषय क्र.६) प्र.क्र.२० महात्मा फुलेनगर व लांडेवाडी बसाहतीस मध्ये गल्ली क्रमांक,नाव व नंबर टाकणेबाबत – मा.सुजाता पालांडे,मा.उषा ऊर्फ माई ढोरे यांचा प्रस्ताव

विषय क्र.७) प्र.क्र.२० येथील पिंपरी पुलाखाली या भागातील जुने व नादुरुस्त असलेले शौचालय पाडून नविन सुलभ शौचालय उभारणेबाबत – मा.सुजाता पालांडे,मा.उषा ऊर्फ माई ढोरे यांचा प्रस्ताव

विषय क्र.८) १. प्रभाग क्र.२० संत तुकाराम नगर येथील संत तुकाराम महाराज पुतळा येथील चौकाला श्री.छत्रपती संभाजी महाराज चौक असे नामकरण करणेस २. तसेच पुणे – मुंबई हायवेवर असणा-या सबवे ला छत्रपती शिवाजी महाराज असे नांव देणेबाबत - मा.सुजाता पालांडे,मा.उषा ऊर्फ माई ढोरे यांचा प्रस्ताव

विषय क्र.९) प्रभाग क्र.२० महात्मा फुलेनगर येथे भागाबाई लांडगे या आजीच्या येथील जागेवर अंगणवाडी साठी जागा उपलब्ध आहे. तरी सदर जागेवर अंगणवाडी उभारणेबाबत - मा.सुजाता पालांडे,मा.स्वाती (माई) काटे यांचा प्रस्ताव

विषय क्र.१०) प्रभाग क्र.२० गुरुदत्त नगर मधील जुनी बालवाडी पाडून नविन आर.सी.सी.मध्ये बांधणेबाबत – मा.सुलक्षणा धर, मा. शाम लांडे यांचा प्रस्ताव

विषय क्र.११) राष्ट्रीय फेरीवाला धोरणांतर्गत हॉकर्स झोन पुर्नस्थापित करणेबाबत – मा.क्षेत्रीय अधिकारी यांचेकडील जा.क्र. हक्षेका/४/कावि/१२१/२०१८, दि. ६/१२/२०१८ चा प्रस्ताव

मा.सभापती – गुरुवार दिनांक ०३/१/२०१९ रोजी दुपारी ११.४५ वाजेपर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

Ambale

(मा.अंबरनाथ चंद्रकांत कांबळे)
सभापती
ह प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८

मा. ह प्रभाग मासीक सभा

सभावृत्तांत

**कार्यपत्रिका क्रमांक – १०**

( दि.६/१२/२०१८ ची तहकूब सभा )

**दिनांक – ०३ / १ / २०१९ वेळ. दुपारी ११.४५ वाजता**

..................................................................................................................

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. ह प्रभाग समितीची दि. ६/१२/२०१८ रोजीची तहकूब सभा गुरुवार दिनांक ०३/१/२०१९ रोजी दुपारी ११.४५ वाजता ह क्षेत्रीय कार्यालयातील "पं.दीनदयाळ उपाध्याय सभागृहात" आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य / सदस्या उपस्थित होते.

| अ.क्र. | सन्मा.सदस्य नांव | |
|---|---|---|
| १ | मा. कांबळे अंबरनाथ चंद्रकांत | सभापती |
| २ | मा. सुलक्षणा राजू धर | सदस्या |
| ३ | मा. शाम गणपतराव लांडे | सदस्य |
| ४ | मा. सुजाता सुनिल पालांडे | सदस्या |
| ५ | मा. आशा धायगुडे – शेंडगे | सदस्या |
| ६ | मा. रोहित (आप्पा) सुदाम काटे | सदस्य |
| ७ | मा. राजापुरे माधवी राजेंद्र | सदस्या |
| ८ | मा. चौगुले सीमा दत्तात्रय | सदस्या |
| ९ | मा. हर्षल मच्छिंद्र ढोरे | सदस्य |
| १० | मा. संजय गुलाब कणसे | स्विकृत सदस्य |
| ११ | मा. ज्ञानेश्वर मुरलीधर थोरात | स्विकृत सदस्य |

याशिवाय श्रीम.आशा राऊत प्रशासन अधिकारी तथा क्षेत्रीय अधिकारी, श्री.केशवकुमार फुटाणे (कार्य. अभियंता स्था), श्री.संजय खाबडे (कार्य अभियंता वि), श्री.दिलीप धुमाळ (उप.अभियंता वि), श्री.नरोटे सुनिल (उप.अभियंता स्था.उ) श्री.पाटील एस.बी.(उपअभियंता पापु), श्री.काशिद संजय (उप अभियंता बी.आर.टी.एस.स्था), श्री. शशिकांत दवंडे (उप अभियंता पापु),श्री.बाराथे ( लेखाधिकारी), श्री.देवचके यु.यु.(अतिक्रमण निरीक्षक), श्री.डी.एस.सासवडकर (सहा. आरोग्याधिकारी ), श्री.राजेश भाट (सहा.आरोग्याधिकारी वैद्यकिय विभाग), श्री. पटेल जे.व्ही. (सहा.उद्यान अधिक्षक), श्री.जाधव अजय (मु.आ.नि.),श्री.एस.एस.कुलकर्णी (क.अ.पापु), श्रीम.अंकिता मोरे (क.अ.स्था.उ.), श्री. खरटमोल एम.व्ही (क.अ.पापु), श्री.जिंतीकर आर.एन. (क.अ.जनि), श्रीम.यादव प्रिती (क.अ.जनि ), श्री. समीर दळवी (क.अ.वि),श्री.संदिप लोहकरे (क.अ.जनि), श्री.जे.डी.देवकर (क.अभि.झोनिपू स्थापत्य),श्री.निलेश दाते (क.अ.पापु), श्री.अमर जाधव (क.अ.पापु), अमित दिक्षित (क.अ.पापु), श्री.एस.बी.मानमोडे (आ.नि.), श्री.एस.एस.चव्हाण (आ.नि.), श्री.उध्दव डवरी (आ.नि.) श्री.सोमनाथ जाधव (लिपीक) हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

**मा.सभापती** – उपस्थित सन्मा.सदस्य अधिकारी / कर्मचारी सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

अ) दिनांक ४/१०/२०१८ व दिनांक १/११/२०१८ रोजी झालेल्या सभेचा **( कार्यपत्रिका क्र.८ )** चा सभावृत्तांत कायम करणे

आ) दिनांक १/११/२०१८ रोजी झालेल्या सभेचा **( कार्यपत्रिका क्र.९ )** चा सभावृत्तांत कायम करणे

ठराव क्र - ३०
दि - ३/१/२०१९

विषय क्र - १
विभाग – नगररचना

सुचक - मा. सुजाता पालांडे
अनुमोदक – मा. सुलक्षणा धर

संदर्भ - मा.आयुक्त यांचेकडील जा.क्र. नरवि /कावि/१५/३१८/२०१८ दि.२५/१०/२०१८ चा प्रस्ताव

विषय- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या जुन्या हद्दीच्या सुधारित मंजूर विकास योजनेतील मौजे पिंपरी वाघेरे नं.१९२,१९४,१९७,१९८,१९९,२०० व २०१ या मे हिंदूस्थान एंटीबायोटिक्स कंपनीच्या मिळकतीमध्ये मुंबई – पुणे लोहमार्गालगत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २०५ अन्वये १२.००मी.रुंदीचा रस्ता घोषित करणे

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या जुन्या हद्दीमध्ये सुधारित मंजूर विकास योजनेनुसार मौजे पिंपरी वाघेरे हद्दीमध्ये मे. इंडीयन कार्ड क्लोथिंग लि. कंपनी व मुंबई – पुणे लोहमार्ग यामध्ये विकास योजने मधिल १२.०० मी. रुंदीचा रस्ता असुन तो महानगरपालिकेच्या स्थापत्य विभागा मार्फत विकसीत करण्यात येत असून, मे. हिंदूस्थान एंटीबायोटिक्स कंपनीच्या स.नं. २०२ पै. या मिळकती मध्ये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०५ अन्वये घोषित केलेला १५ मी. व १८.०० मी. रुंदीचा रस्ता जागेवर विकसीत झालेला आहे. तथापी या दोन रस्त्याच्या मधिल मे. हिदुस्थान एंटीबायोटिक्स कंपनीच्या स.नं. १९२, १९४, १९७,१९८, १९९, २०० व २०१ या मिळकती मध्ये मंजूर विकास योजनेतील अथवा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २०५ अन्वये घोषित केलेला रस्ता नसल्याने मुंबई – पुणे लोहमार्गालगत सलग रस्ता उपलब्ध होत नाही. सदरचा सलग रस्ता उपलब्ध होण्याकरिता विषयांकित पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या जुन्या हद्दीच्या सुधारित मंजूर विकास योजनेतील मौजे पिंपरी वाघेरे स.न.१९२,१९४,१९७,१९८,१९९,२०० व २०१ या मे. हिंदूस्थान एंटीबायोटिक्स कंपनीच्या मिळकतीमध्ये मुंबई-पुणे लोहमार्गालगत **महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २०५ अन्वये १२.०० मी. रुंदीचा रस्ता घोषित करणे कामी मा.प्रभाग समिती मध्ये ठराव मंजूर करणे. कलम २०५ अन्वये घोषित करावयाच्या रस्त्याची जाहिर सुचना प्रकाशित करुन हरकत / सुचना मागविणे, प्राप्त हरकत / सुचना यावर सुनावणी घेणे याप्रमाणे वैधानिक कार्यवाही करणे आवश्यक आहे.**

त्यास अनुसरुन विषयांकित पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या जुन्या हद्दीच्या सुधारित मंजूर विकास योजनेतील मौजे पिंपरी वाघेरे स.नं. १९२,१९४, १९७, १९८,१९९, २०० व २०१ या मे.हिंदूस्थान ॲंटीबायोटिक्स कंपनीच्या मिळकतीमध्ये मुंबई – पुणे लोहमार्गालगत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २०५ अन्वये १२.०० मी. रुंदीचा रस्ता घोषित करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वांनुमते मान्य झाला.

---

ठराव क्र - ३१ | विषय क्र - २
दि - ३/१/२०१९ | विभाग – नगरसचिव
सुचक – मा.शाम लांडे | अनुमोदक - मा.रोहित काटे

संदर्भ - मा. क्षेत्रीय अधिकारी यांचेकडील जा.क्र. हक्षेका/१०/कावि/ १६९/२०१८ दि. १४/११/२०१८ चा प्रस्ताव

विषय - मा. ह प्रभाग समिती नामनिर्देशित सदस्य यांना आयडेंटीटी कार्ड, व्हिजिटींग कार्ड, शिफारस पत्र, लेटरपॅड इत्यादी सुविधा महापालिकेच्या भांडार विभागामार्फत उपलब्ध करुन देणेबाबत.

विषय क्र.२ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वांनुमते मान्य झाला.

---

सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले –

ठराव क्र - ३२ | विषय क्र - ३
दि - ३/१/२०१९ | विभाग – स्थापत्य
सुचक – मा. रोहित काटे | अनुमोदक - मा. आशा धायगुडे - शेंडगे

संदर्भ - मा. रोहित काटे,मा.आशा धायगुडे –शेंडगे यांचा दि. ६ / १२ / २०१८ चा प्रस्ताव

प्र.क्र.३० कासारवाडी येथील सर्व्हे क्र. ४९७/२३ येथे नव्याने विकसीत करण्यात आलेल्या क्रीडांगणास कासारवाडीतील ज्येष्ट सामाजिक कार्यकर्ते “कै.तानाजी पांडुरंग लांडगे” असे नाव देणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावा प्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वांनुमते मान्य झाला.

---

ठराव क्र - ३३ | विषय क्र - ४
दि - ३/१/२०१९ | विभाग – स्थापत्य
सुचक – मा. रोहित काटे | अनुमोदक - मा. राजू बनसोडे

संदर्भ - मा. रोहित काटे,मा. राजू बनसोडे यांचा दि. ६ / १२ / २०१८ चा प्रस्ताव

प्र.क्र.३० दापोडी येथील आई उद्यानातील ओपन जिमचे साहित्य मोडकळीस आलेले आहे. त्याचे काही भाग तुटलेल्या अवस्थेत आहेत. तरी आई उद्यानातील ओपन जिमचे नवीन साहित्य बसविणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावा प्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वांनुमते मान्य झाला.

---

ठराव क्र - ३४
दि - ३/१/२०१९

विषय क्र - ५
विभाग – स्थापत्य

सुचक – मा. सुजाता पालांडे

अनुमोदक - मा. उषा ऊर्फ माई ढोरे

संदर्भ - मा. सुजाता पालांडे, मा.उषा ऊर्फ माई ढोरे यांचा दि. ६ / १२ / २०१८ चा प्रस्ताव

प्र.क्र.२० संत तुकाराम नगर येथील घर नंबर २८३२ ते २९१९ या परिसरात "श्री.दत्त दिगंबरा कॉलनी" हे नांव देणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावा प्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वांनुमते मान्य झाला.

---

ठराव क्र - ३५
दि - ३/१/२०१९

विषय क्र - ६
विभाग – स्थापत्य

सुचक – मा. सुजाता पालांडे

अनुमोदक - मा. उषा ऊर्फ माई ढोरे

संदर्भ - मा. सुजाता पालांडे, मा.उषा ऊर्फ माई ढोरे यांचा दि. ६ / १२ / २०१८ चा प्रस्ताव

प्रभाग क्र.२० मध्ये महात्मा फुलेनगर व लांडेवाडी वसाहतीमध्ये जवळपास अंदाजे एकत्रित ४००० घरे आहेत व १०० ते १५० गल्ल्या आहेत. या वसाहतीमध्ये सुटसुटीतपणा दिसून येण्यासाठी गल्लीला नाव व क्रमांक टाकणे गरजेचे आहे. यामुळे स्थानिकांना आपले टपाल पत्र,कुरियर व इतर तात्काळ शोध घेण्यासाठी फायदेशीर होणार आहे. तरी महात्मा फुलेनगर व लांडेवाडी या दोन्ही वसाहतीमध्ये प्रत्येक गल्ली,घर व महत्वाच्या ठिकाणाला नाव,नंबर व क्रमांक टाकणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वांनुमते मान्य झाला.

---

ठराव क्र - ३६
दि - ३/१/२०१९

विषय क्र - ७
विभाग – स्थापत्य

सुचक - मा. सुजाता पालांडे

अनुमोदक - मा. उषा ऊर्फ माई ढोरे

संदर्भ - मा. सुजाता पालांडे, मा.उषा ऊर्फ माई ढोरे यांचा दि. ६ / १२ / २०१८ चा प्रस्ताव

प्रभाग क्र.२० मध्ये पिंपरी पुलाखालील शौचालय जुने व नादुरुस्त असल्याने नागरिकांची गैरसोय होत आहे. सदरील भाग हा दाट लोकवस्तीचा असुन नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी सदरील भागातील जुने व नादुरुस्त शौचालय पाडून त्या ठिकाणी नवीन सुलभ शौचालय उभारणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वांनुमते मान्य झाला.

---

ठराव क्र - ३७
दि - ३/१/२०१९

विषय क्र - ८
विभाग – स्थापत्य

सुचक - मा. सुजाता पालांडे

अनुमोदक - मा. उषा ऊर्फ माई ढोरे

संदर्भ - मा. सुजाता पालांडे, मा.उषा ऊर्फ माई ढोरे यांचा दि. ६ / १२ / २०१८ चा प्रस्ताव

प्रभाग क्र.२० संत तुकाराम नगर येथील संत तुकाराम महाराज पुतळा येथील चौकाला "श्री.छत्रपती संभाजी महाराज चौक" असे नामकरण करणेस तसेच पुणे – मुंबई हायवेवर असणा-या सबवे ला "श्री. शिव छत्रपती शिवाजी महाराज" असे नांव देणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावा प्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वांनुमते मान्य झाला.

----

ठराव क्र - ३८ | विषय क्र - ९
दि - ३/१/२०१९ | विभाग – स्थापत्य
सुचक - मा. सुजाता पालांडे | अनुमोदक - मा. स्वाती ( माई ) काटे

संदर्भ - मा. सुजाता पालांडे, मा. स्वाती ( माई ) काटे यांचा दि. ६ / १२ / २०१८ चा प्रस्ताव

प्रभाग क्र.२० महात्मा फुले नगर येथे भागाबाई लांडगे या आजीच्या येथील जागेवर अंगणवाडी साठी जागा उपलब्ध आहे. सदर जागेवर शैक्षणिक कामासाठी ब-याच वर्षापासून जागा मोकळी आहे. महात्मा फुलेनगर वसाहत दाट लोकसंख्या वस्तीचा असून शिशु वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी सदरील जागेवर त्वरीत अंगणवाडी उभारणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावा प्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्र - ३९ | विषय क्र - १०
दि - ३/१/२०१९ | विभाग – स्थापत्य
सुचक - मा. सुलक्षणा धर | अनुमोदक - मा. शाम लांडे

संदर्भ - मा. सुलक्षणा धर, मा.शाम लांडे यांचा दि. ६ / १२ / २०१८ चा प्रस्ताव

प्रभाग क्र.२० मधील गुरुदत्त नगर मध्ये असणारी बालवाडी ही मोडकळीस आली असुन व त्याची जागाही अपुरी पडत असल्याने ती इमारत तोडून त्याच जागी नवीन आर.सी.सी.मध्ये दुमजली इमारत बांधणे आवश्यक आहे. तरी सदर जुनी बालवाडी पाडून नवीन आर.सी.सी. बालवाडी बांधणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्र - ४० | विषय क्र - ११
दि - ३/१/२०१९ | विभाग – प्रशासन
सुचक - मा. माधवी राजापुरे | अनुमोदक - मा. सीमा चौगुले

संदर्भ - मा. क्षेत्रीय अधिकारी यांचेकडील जा.क्र.हक्षेका/४/कावि/१२१/२०१८ दि.६/१२/२०१८ चा प्रस्ताव

विषय – राष्ट्रीय फेरीवाला धोरणांतर्गत हॉकर्स झोन पुर्नस्थापित करणेबाबत

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ह क्षेत्रीय कार्यालयाची नव्याने स्थापना दि. ९/८/२०१७ रोजी क क्षेत्रीय व ड क्षेत्रीय कार्यालयाच्या अंतर्गत प्रभागांतून झालेली आहे. त्यानुसार ह क्षेत्रीय कार्यालयांतर्गत प्रभाग क्र.२०,३०,३१,३२ असे चार प्रभाग आलेले आहेत. तरी राष्ट्रीय फेरीवाला सर्व्हेक्षण धोरण यापूर्वीच्या क्षेत्रीय कार्यालयामार्फत राबविणेत आलेले असून, ह क्षेत्रीय कार्यालयांतर्गत नव्याने आलेल्या प्रभागांमध्ये राष्ट्रीय फेरीवाला सर्व्हेक्षण धोरण / नियमानुसार हॉकर्स झोन / नो हॉकर्सझोन निश्चित / पुर्नस्थापित करणेची तदअनुषंगिक इ. कार्यवाही करणे आवश्यक आहे.

तरी राष्ट्रीय फेरीवाला धोरण कार्यवाहीच्या अनुषगाने ह क्षेत्रीय कार्यालयाकडील हॉकर्स झोन पुर्नस्थापित उपसमितीच्या सुचनेनुसार, कार्यकारी अभियंता स्थापत्य विभाग, ह क्षेत्रीय कार्यालय दि.१९/९/२०१८ चे पत्रान्वये खाली दर्शविलेल्या जागांवर हॉकर्स झोन करणेस व या जागांव्यतिरिक्त इतर क्षेत्र नो हॉकर्स झोन करणेस कळविलेले आहे.

| अ.क्र | प्रभाग क्र. | प्रभागाचे नांव | जागेचा तपशील | संख्या | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २० | संत तुकारामनगर | एच.ए.पेट्रोल पंप ते डी.वाय.पाटील इंजिनियरींग कॉलेज | २०० | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २ | | कासारवाडी | महात्मा फुलेनगर झोपडपट्टी ते गुडविल चौक रोड | ७५ | एम.आय.डी.सी.रोड |
| ३ | ३० | दापोडी-कासारवाडी | शितळादेवी चौक सिध्दी हाईटस समोर | २० | |
| ४ | ३१ | नवी सांगवी पिंपळे गुरव | काटेपुरम चौक ते रामकृष्ण मंगल कार्यालय (बॅटमिंटन हॉल जवळ) | १० | |
| ५ | | | कोकरिया गॅस ते एम.के.हॉटेल चौक | २० | |
| ६ | | | फेमस चौक ते मिलीटरी हद्दीपर्यंत | १० | |
| ७ | | | कृष्णा चौक ते नर्मदा गार्डन | २० | |
| ८ | ३२ | जुनी सांगवी | B.S.N.L. ऑफीस रस्ता | १५ | |
| | | | एकूण | ३७० | |

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र.संकीर्ण – २५१७ / प्र.क्र १६१/नवि-२१ दिनांक ९ ऑक्टोबर २०१७चे अन्वये मा.उच्च न्यायालय दाखल रिट याचिका क्र.२२४/२०११ तसे जनहित याचिका क्र.३६/२०१० व इतर याचिकामध्ये मा. उच्च न्यायालयाने २३ ऑक्टोबर २०१५ रोजी दिलेल्या निकालानुसार रुग्णालये, धार्मिक स्थळे, शैक्षणिक संस्था यांचेपासून १०० मीटर व रेल्वे स्टेशन,महानगरपालिका बाजारपेठ वा इतर बाजारपेठापासून १५० मीटर अंतरापर्यंत नो हॉकर्स झोन घोषित करणेबाबत कळविले आहे. त्याप्रमाणे प्रभाग क्र.२०,३०,३१,३२ मध्ये नो हॉकर्स झोन व हॉकर्स झोन करणे आवश्यक आहे

वरील दर्शविलेल्या जागांवर नव्याने हॉकर्स झोन पुर्नस्थापित करणेकामी, हॉकर्स झोन उपसमितीने पाहणी केलेली आहे. तरी मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार तसेच पथविक्रेता (उपजिविका संरक्षण व विनियमन) अधिनियम २०१४ तसेच त्याअंतर्गत तयार करणेत आलेले सन २०१६ मधील नियम व पथविक्रेता योजना २०१७ मधील तरतूदींचा विचार करुन सदर जागांवर हॉकर्स झोन करणे योग्य असलेचे निदर्शनास येत आहे. तरी राष्ट्रीय फेरीवाला धोरण सर्व्हेक्षणात परवानाधारक / पात्र झालेल्या अधिकृत हॉकर्सधारकांनाच सदर ठिकाणी स्थलांतरीत करणे आवश्यक आहे. तसेच निश्चित केलेल्या हॉकर्सझोन मध्ये हॉकर्सधारकांची संख्या जागेच्या उपलब्धतेनुसार नियमानुसार ठरवून देण्यात येतील व राष्ट्रीय फेरीवाला धोरण नियमानुसार आवश्यक ती कार्यवाही करणेकामी मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वांनुमते मान्य झाला.

---

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

(मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत)
सभापती, ह प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

जा.क्र. हक्षे / १० / कावि / ३ / २०१९
दिनांक : ८ / ०१ / २०१९

प्रशासन अधिकारी
तथा
सचिव (सभाशाखा)
ह प्रभाग समिती

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर